# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०५/२०२५ (बुधवार)**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद १आरोपी अटक, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक १३/०५/२०२५ रोजी केळवद पोलीस हे पोलीस स्टेशन केळवद च्या समोर नाकाबंदी करीत असतांना पहाटे ०४:०० वाजेच्या सुमारास एक **हिरो कंपनीची दुचाकी वाहन क्रं एम. एच. २७ बी.एच. ३६९१ हे** वाहन छिंदवाडा कडुन नागपुर कडे येताना दिसले. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता त्यावर पास्टीक पोत्यात तसेच बॅगमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आला. वाहन चालक **आरोपीला नाव पत्ता विचारले असता त्याने रोहित विनोद शुक्ला, वय—३० वर्षे, रा. घर संसार सोसायटी, नवीन नगर, पारडी, जि. नागपुर अशी माहीती पोलीसांना दिली. पोलीसांनी नमुद आरोपी** याचे ताब्यातुन पंचासमक्ष **१) पानमसाला पानबहार ब्रॅन्ड ,२) सॅफ्रॉन ब्लेन्डेड पानमसाला विमल ब्रॅन्ड ,३) पानमसाला राजश्री ब्रॅन्ड, ४) सुगंधित तबांखु व्ही —१ ब्रॅन्ड असा एकुण २५.१६५ किलो प्रतिबंधीत सुगंधित तंबाखु साठा किंमती ४८,१२०/— रूपये तसेच एका हिरो कंपनीची दुचाकी वाहन क्रं एम एच २७ बी.एच. ३६९१ किंमती ५०,०००/— रुपये असा एकुण किंमती ९८,१२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक १३/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई करीता पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, **नरखेड येथील आ.यु.डी.पी.परीसरात** काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन धाड टाकली असता काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी सापळा रचुन कारवाई केली आणि आरोपी नामे १.**हरदयालसिंग जोगेंद्रसिंग बावरी वय ३४ वर्षे रा. कळमेश्वर ता.कळमेश्वर, २ अनिल सुधाकर चरडे ,वय ३२ वर्षे,रा नरखेड यांना पोलीसांनी जागीच पकडले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष ५२ तास पत्ते व रोख रक्कम १४,०००/— रूपये आणि २ ॲड्रॉईड मोबाईल असा एकुण ३२,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

आरोपी नामे १.**हरदयालसिंग जोगेंद्रसिंग बावरी वय ३४ वर्षे रा. कळमेश्वर ता.कळमेश्वर, २ अनिल सुधाकर चरडे ,वय ३२ वर्षे,रा नरखेड** आणि इतर २ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने